I J R S S I S, Spl Issue (III), July-2020 : 323-327
A Double-Blind Peer Reviewed Journal
OPEN ACCESS
e-ISSN 2347 – 8268 & 2347-8209 (P)
Original Article
INTERNATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCE AND INFORMATION STUDIES
© VMS RESEARCH FOUNDATION www.ijrssis.in

# कोवीड–19 नंतर भारताची बदलती संरचना

D. V. Dhodeswar
Chintamani Mahavidyalaya Pombhurna, Dist. Chandrapur.
*Corresponding Author: dvg1202@rediffmail.com

**सरांश :**

डोळयांना न दिसणा–या अतिसुक्ष्म कोरोणा विषाणूने अवघ्या जगाला हादरा दिला आहे. सत्ता संपत्ती आणि शस्त्रास्त्राच्या बळावर जगावर राज्य करू पाहणा–या महासत्तानाही कोरोणाने त्याची जागा दाखवून दिली. गरिब, मध्यम, वर्गीय, श्रिमंत यांच्या सह जगातील सर्व धर्म –पंथ वर्ग–वर्ण आस्तीक –नास्तीक ज्ञानी –अज्ञानी, कट्टर धार्मीक, समाजवादी पुरोगामी, प्रतिगामी अषा सा–यांनाच कोरोनाने एका पारडयात आणले. कोराणाचा कहर कधी सपंणार हाच एकमेव प्रश्न सा–यांना सतावतो आहे. कोरोणाच्या तडाख्यातुन कुणीही सुटलेला नाही. जात, धर्म, पंथ, वर्ण, देश, भाषा, प्रांत यामध्ये फरक न ठेवता कोरोनाने सा–यांनाच कवेत घेतले . कोरोणा महामारीचे भविष्य सांगता आले नाही की पूढे कोरोणा आपल्याला कुठे घेवून जाणार हे कुणाला सांगता येत नाही. सदर लेखात कोवीड–19 नंतर भारतातर होणाऱ्या सामाजिक, आर्थिक, राजनैतिक इत्यादी बदलांचे विवेचन केलेले आहे.

**बीजशब्दः** कोवीड–19, भारत, सामाजिक, आर्थिक, राजनैतिक बदल

## प्रस्तावनाः

सद्या जगभरात कोरोना विषाणूच्या साथीने थैमान घातले आहे. या साथीत जगभरात आतापर्यन्त दोन लाखाच्या वर मृत्यूमूखी झाले आहेत. या साथीमुळे बलशाली सत्ता देखील हतबल झालेल्या दिसत आहेत. अगदी सुक्ष्म स्वरूपातील या विषाणूने परिस्थिती चिंताजनक केली आहे. या साथीच्या वाढत्या प्रसारामुळे जगभरातील मानवी समुहाला जिवंत राहणे हिच प्रथम प्राथमीकता आहे. हे अधोरेखीत करायला भाग पडले आहे. या विषाणूचा प्रादूर्भाव जगभरातील अनेक श्रिमंतापासून ते गरिबापर्यन्त होतोय. जोपर्यन्त या विषाणूचे स्वरूप, त्याचा प्रसार आणि व्याप्ती याचा ताळेबंद घालण्याचा आतच या विषाणूने व्यस्त प्रमाणात प्रसरायला सुरवात केली आहे. अजुनही या आजारावर लसव बनविण्यात शास्त्रज्ञांनां यश आलेले नाही. भारतात देखील कोरोणाची साथ प्रचंड प्रमाणात पसरत आहे. भारतात आजच्या घडीला तिन लाख ब्यांशी हजाराच्या वर रूग्ण निदर्शनास आले आहे. त्यामध्ये बारा हजार पाचशेच्या वर मृत्यूमुखी झाले. कारोनामुक्त एक लाख ़त्रेसष्ठ हजार दोनशे च्या वर झाले आहेत. आणि बाकी रूग्णावर उपचार सुरू आहे.

गेल्या 24 मार्चला रात्री 8 वाजता देशाला संबोधीत करतांना 21 दिवसांच्या संचारबंदीची घोषणा प्रधानमंत्री यांनी केली कोरोनाचा प्रादूर्भाव रोखण्यासाठी बरेच कर्तव्यदक्ष लोक अहोरात्र आपल्या जीवाची परवा न करता सेवा देत आहेत. या लोकाप्रती सामा. कृतज्ञता म्हणून टाळया/थाळया इत्यादी वाजवून या सर्व लोकांचे आभार प्रधानमंत्री यांनी प्रदर्शन करायला सांगीतले होते. देशातील काही भागातील लोकांनी कफ्यूचे गांर्भीर्याने पालन केले नाही. उलट कर्फ्यूला थोड

कंटाळून तीन तेरा वाजविले. आणि आपली सामाजिक कृतज्ञता व्यक्त करायला सुरूवात केली यामध्ये काही जण ढोल, ताशा , फटाके घेवून रस्त्यावर चौकाचौकात पोहचले. या सर्व गोष्टीचा भूतकाळ आपल्याला माहितच आहे.

दोन ते अडिच महिन्याच्या लॉकडाउन काळात ब–याच ठिकाणी किराणामालासाठी तसेच दैनदिन आवश्यक वस्तू मिळविण्यासाठी गर्दी झाल्याची पाहायला मिळाली. पुढचे काही दिवस घराबाहेर जाता येणार नाही. हा विचार करून सामाजिक अंतराचे भान न ठेवता कोरोना संसर्गाचा धोका पत्करून खरेदीला बाहेर पडण्याचे ठरविले. जवळच्या किराणा दुकानामध्ये किंवा भाजी मार्केटमध्ये गर्दी केली. दुसरीकडे सामाजिक माध्यमावर कर्फ्यूचे उल्लंघन केल्यानंतर पोलीसाच्या लाठी खाल्लेल्या लोकांचे व्हिडीओ देशभरात फिरत आहेत. आता मुद्दा खरतर इथून सुरू होतो. की इतक्या भयंकर संसर्गजन्य आजाराची स्थिती गंभीर होण्याची चिन्हे असतांना प्रधानमंत्री रात्री आठ वाजता देशातील नागरीकाशी संवांद साधून त्याच दिवशी रात्रीच्या बारा वाजेपासून 21 दिवसाचा लॉकडाउन पूर्ण देषात लागू करण्यात येत आहे. आणि हा लॉकडाउन समोर टप्याटप्याने वाढतच केला. याचा अर्थ संपूर्ण देश ब्रद करून कोरोणाचा प्रसार थांबविण्यासाठी लॉकडाउन हा चांगला निर्णय आहे. या लॉकडाउनमुळे विशिष्ठ सामाजिक अंतर राखल जाईल आणि या आजाराचा जास्त प्रसार होणार नाही. हा विचार बरोबर असला तरी प्रधानमंत्रीची तातडीने लॉकडाउनची केलेली घोषणा हि चुकीची होती. भारतात आजच्या घडीला बहूंसंख्य लोकांमध्ये गरिब, मजूरवर्ग, निम्न मध्यमवर्ग आणि मध्यम वर्ग मोठया संख्येने असतात. सूरूवातीचा लॉकडाउनचा निर्णय देषातील लोकांना विश्वासात न घेता घेतला गेला. याचे परिणाम येणा–या काळात विविध स्तरांतुन पहायला मिळतील. भारतीय समाजात अस्तित्वात असणारी विषमता कोरोणामुळे अजून गडद होतांना दिसेल. असे होतांना रूग्णंना मिळणा–या सोयीपासून ते किरानामाल आणि जिवनावश्यक वस्तुसाठी येणा–या काळात विविध पातळीवर प्राध्यान्यक्रम नाकारता येणार नाही.

सद्या काही ठिकाणी हा आजार पसरत आहे. तिथे एका विशिष्ठ धर्माला कारणीभूत मानले जात आहे. त्यामुळे धार्मीक तेढ वाढण्याची देखील शक्यता आहे. देशातील ब–याच भागासोबत आदिवासी भागात देखील शहरातून येणा–या लोकांना गावात प्रवेश दिला जात नाही. प्रवेश रोखण्यासाठी गावातील मुख्य रस्त्यावर काठया, दगड ठेवून आडकाठी निर्माण केली जाते. किंवा गावात प्रवेश करित असलेल्या व्यक्तीला मुख्य रस्त्यावर अडकवून गरम पाण्याने पाय धूवून व सेनिटायजरचा वापर केल्यानंतरच गावात प्रवेश दिला जातो. आदिवासी भागात अंधश्रध्दा या पूर्वीपासून आहेत. त्यामध्ये भगता तर्फे असेल किंवा कोणाच्या सांगययावरून एखाद्याला संकटातुन वाचविण्यासाठी बळी देण, एखाद्या व्यक्तीला संशयावरून गावाबाहेर काढण्याचा प्रकार होतात. या आजाराच्या बाबतीत देखील उलटसुलट चर्चामुळे काही भागात असे प्रकार

आढळून आले आहेत. यावर स्वयंसेवी संस्थाकडून, शासनाकडून किंवा महाविद्यालयीन विद्यार्थ्याच्या माध्यमातुन जणजागृती करणे आवश्यक आहे.

सद्या भारतीय अर्थव्यवस्थेची असणारी स्थिती आणि कोरोनाचा संकट अत्यंत बिकट परिस्थितीला जन्म घालेल. लोकांना काही दिवसांनंतर जर रोजगार भेटला नाही तर कोरोनापेक्षा उपासमारीने जीव गेल्याच्या घटना समोर येतील. शासनाने हॉस्पीटल, सर्वांना घर, शिक्षण, रोजगार, अन्नधान्य पुरवठा अशा प्राथमीक गोष्टीकडे शासनाने लक्ष दिले पाहिजे. खेळत्या पैशाच्या अभावाने बाजारात आलेला स्थूलपणा आणि त्यातुन वाढणारी बेरोजगारी बॅकांनी दिलेली कर्जाउ रक्कम परत न आल्याने बॅकाचे निघालेले दिवाळखोरी, शेअर मार्केटमधील उतार तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावरील रूप्याची घसरणारी किंमत , जीडीपीची सातत्याने होणारी घसरण या सर्व गोष्टी नोटबंदीनंतर सातत्याने पाहतो. सध्याची भारतीय अर्थव्यवस्था दृष्ट चक्रात सापडली आहे. त्यामुळे लोकांच्या हातात कामधंदा नाही. पैसे नाहित बॅक बचत/ठेवी नाहित. हातात असलेल्या नौक–या जावून बेरोजगार होण्याची वेळ तरूण वर्गावर आलेली आहे. नेमक्या या परिस्थितीत कोरोणाच्या प्रार्दूभावामुळे हतबलता वाढत चालली आहे.

ग्रामीण भागातुन शहराकडे रोजगारासाठी स्थलांतरीत झालेला मोठा वर्ग आहे. सरकारने लॉकडाउन करत असतांना या वर्गाला देखील तेवढेच प्राधान्य द्यायला हवे होते. पण झाले मात्र याच्या विरूध्द लॉकडाउन घोषनेत आणि प्रत्यक्ष अमलबजावणी फक्त काही तासाचा कालावधीमूळे बहूसंख्य असणाच्या वर्गातील लोंकाना जिवनावश्यक वस्तु किराणामाल, पैसे इत्यादीची जमवाजमव करण्यास पुरेसा वेळ मिळाला नाही. बरेच स्थलांतरीत लोक आपल्या गावी पायी चालत जातांना दिसत होते. बरेच लोक अन्नवाचून पाण्यावाचून रस्त्यावरच तळफळून मरण पावत होते. लॉकडाउनच्या काळात स्थलांतरीत मजूराच्या मुत्यूचा आकडा जास्त आहे.

सद्या जिवनावश्यक गोष्टीची मागणी वाढत आहे. त्यामुळे ठरावीक काळाने या वस्तूचा तुटवडा बाजारात निर्माण होईल आणी यामुळे वस्तुच्या किमतीत वाढ होईल. तसेच जास्त नफा कमविण्यासाठी वस्तुवरील नफेखोरी आणी मक्तेदारी देखील वाढेल. भारतीय सरकार सुध्दा कच्चा तेलाच्या किमतीत घसरण झाली असतांना जास्तीत जास्त विविध कर आकारूण पेट्राल आणि डिझेल च्या किंमती वाढवून जास्तीत जास्त नफा मिळविण्याचा प्रयत्न करित आहे. हे करित असतांना सर्वसामान्या ग्राहकाच्या खिशाला मात्र कात्री लागत आहे. सध्या भारतामध्ये एकून उपलब्ध असणा–या डॉक्टरची संख्या बेडची संख्या तसेच व्हेंटीलेटर, मास्क आणी इतर अत्याधुनिक उपकरणे ही भारताच्या एकून लोकसंख्येपेक्षा खुपच कमी आहेत. तसेच रूग्ण तपासण्या वेळोवेळी लागणा–या साधन सामुग्रीचा तुटवडा असल्याने डॉक्टर, नर्स, पोलीस, आणि इतर जे लोक पायाभूत प्राथमीक जबादारीने काम करत आहेत त्यांना संसर्ग होण्याचा धोका आहे.

डॉक्टर, नर्सेस, वार्डबॉए साठी सुरक्षेच्या दृष्टीने उच्च दर्जाची पीपीटी किट उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. पोलीसांना गस्त करित असतांना किंवा रूग्ण शोधत असतांना ब–याच पोलीसांना कोरोणाची लागण झाली. त्यामुळे बरेच पोलीस मुत्यूमुखी पडले. त्यांच्या सुरक्षेच्या दृष्टीने उपाययोजना करणे आवश्यक आहे. कोरोणाच्या पार्श्वभूमीतुन समाजाच्या संरचनेत काही बदल झालेले दिसून येतात.

वर्षानुवर्ष मनुष्य सत्याचा शोध घेतोय 'मी कोण' हे शोधण्याचा प्रयत्न करतो. अर्थात याचा शोध कुणाला अजून कुणाला लागला नसला तरी मानवाला त्याच्यातील मी मात्र कोरोणाने विसरायला लावला. कोरोनापूढे सर्वाचाच मी पणा गळून पडला. माझयापूंढे अवघी मानव जात क्षुल्लक असल्याने कोरोणाने दाखवून दिले. कोरोनानंतर अवघे जग बदललेले असेल. त्याची सुरवातही झालीच आहे. कामधंदा नोक–या करण्याची पध्दती, रोजगार, अर्थव्यवस्था उत्पादने यामध्ये बदल सुरू झाले आहेतच. पण त्याहूनही मोठा बदल मनुष्याच्या आजवरच्या समजतीमध्ये होय असल्याचे दिसत आहो. आपण ज्यामागे धावत होतो. त्या प्रत्यक्षात ख–या होत्या का? याचा विचार मानसाला करावा लागतो.

कोरोणाने आमच्या आस्था परंपरावर हल्ला केलाय, कोरोनाने धर्मावरील अस्था मोडीत काढली कोणताही चमत्कार घडला नाही. यापूढे शाळा, महाविद्यालये रूग्णालये आणि ग्रंथालये उभारण्यावर भर द्यावा लागेल असे अधोरेखीत झाले. कोरोणाचा कहर ओसरू लागल्यावर डोळयांना दिसणारे भौतीक बद्‌दल तर घडतीलच त्यापेक्षा मोठा बदल आध्यात्मिक दृष्टया दिसून येईल. वास्तव बाजुला ठेवून त्याकडे दुर्लक्ष करून जगणा–यांना कोरोना महामारीने हा घालून दिलेला वस्तुपाठ आहे. श्रध्दा असणारे वास्तव समजून घेवून वागत असतात. मात्र कशावरही अंधश्रध्दा ठेवणारे वास्तवापासून दूर पळत राहतात. कोरोनाने त्यांना जागा दाखवून दिली आहे. डोळयावर अति जाड कातडयाचे पांघरून घेवून अंधश्रध्देच्या नावाखाली वास्तवापासून पळणा–यांना त्यांच्या डोळयावर चढलेली जळमटे दूर सारून कोरोनाने वास्तववादी जगात आणण्याचे काम केले आहे. केवळ भौतीक सुख म्हणजे सर्वकाही मानून चालणा–या जगाला कोरोनाने घालून दिलेला हा वस्तुपाढचा ठरणार आहे. आपण ज्या आस्था, परंपरामध्ये गुंतवणूक करित होता. त्यापैकी किती ख–या होत्या किती खोटया होत्या हे समजून घेवून यापूढे वागावे लागेल. त्यातील जे चूमीचे होते त्याला तेथेच सोडून आणि जे चांगले होते त्या सोबत घेवून पूढे जगणे शिकावे लागेल.

आपल्याला कोरोना नावाची ठेच जोरदार लागली आहे. आता आपल्याला स्वतालाही शहाने जागे होतांना आपल्यामागून येणा–यांना जागे आणि शहाने करावे लागणार आहे. भौतीक सुखाच्या मायाजालातुन बाहेर पडावे लागेल वास्तवादी जगात यावे लागेल. कोरोणाला सारे संकट मानत असतानाच हाच कोरोणा वास्तवादी जगण्याची संधी मानवापढे घेवून आला आहे हे विसरता येणार नाही. अवघ्या मानव जातीला

e-ISSN 2347 – 8268 & 2347-8209 (P)
Original Article

एका रांगेत उभा करणारा कोरोना अवघा माणूस बदलण्यासाठीच त्यांच्यातील मी पणा घालविण्यासाठीच आला आहे. हे लक्षात घ्यावे लागेल.

**संदर्भ सुची :**

कोरोणा बदलेली सामा. आर्थिक परिस्थिती
राजरत्न कोसंबी इंटरनेट
संपादकीय, पुण्य नगरी 30 मे 2020